दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजय भांगे मो.नं. ९४२२६६००७७
बीड/महाराष्ट्र | सोमवार १३ मे २०२४ | आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ | वर्ष १ ले | अंक २६९ | पाने ४ | किंमत ४ रुपये

# माजलगावात पोलिसांनी ५२ लाखाचा गुटखा पकडला.
# आयपीएस बी.धीरजकुमार यांच्या पथकाची कार्यवाही

**माजलगाव प्रतिनिधी दि.12** बिदर(कर्नाटककडून) डार्क पार्सल वाहनाने जालना शहराकडे जाणारा 52 लाखाचा गोवा गुटखा पोलिसांनी पकडला.ही कार्यवाही आयपीएस बी.धीरजकुमार यांच्या पथकाने रविवार दि.12 रोजी सकाळी साडेनऊ वाजता माजलगाव शहरानजीक परभणी टी पॉइंट येथे केली. याबाबत समजलेली माहिती अशी की,पोलिसांना खबऱ्यामार्फत टीप मिळाली कि,शनिवारी रात्री (बिदर) कर्नाटक वरून डाक पार्सल (एम. एच.23,बी.जी.6723) या मोठ्या टेम्पो वाहनाने गोवा गुटखा माजलगाव शहरातून जाणार आहे. या माहितीवरून पोलिसांनी रविवारी सकाळी परभणी टी पॉईंट येथे जाळे लावले.यावेळी साडेनऊ वाजता बंद पॅक असलेला संशयित



डाक पार्सल टेम्पो पोलिसांना दिसला. पोलिसांनी वाहन चालकाकडे चौकशी करून टेम्पो पोलीस ठाण्यात नेला. दरम्यान टेम्पो मध्ये पोलिसांना गोवा गुटख्याचे 50 भोत मिळून आले. ज्यात असणाऱ्या गोवा गुटख्याची अंदाजीत किंमत 37 लाख 50 हजार आहे.वाहन मुद्देमालाची किंमत 15 लाख रुपये आहे. हा गुटखा जालना येथील संदीप लकडे या व्यक्तीकडे जाणार असल्याची माहिती ड्रायव्हरने पोलिसांना दिली. दरम्यान पोलीस शिपाई टी.एस. कानतोडे यांच्या फिर्यादीवरून वाहन चालक जयदत्त लिंबाजी ओठले(रा. सोमवाडी अंबाजोगाई जिल्हा बीड) विरुद्ध माजलगाव शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला.ही कार्यवाही आयपीएस बी.धीरज कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पो.शि.आशिषकुमार देशमुख,पोशि ए.एन.मिसाळ,पो. शि.आर.एस. कोकाटे यांनी पार पाडली.

### पोलीस यंत्रणा निवडणूकित व्यस्त आहे असा समज करून तस्करी.

चौथ्या टप्प्यातील लोकसभेची निवडणूक प्रक्रिया सुरू आहे.या प्रक्रियेत प्रशासन,पोलिस यंत्रणा व्यस्त असेल असा समज करून एवढा मोठा गुटखा तस्करी करण्याची रिस्क घेण्यात आली. परंतु गुटखा माफीयाचा हा समज पोलिसांनी मोडून काढत ही कार्यवाही केली.

तुझी माझी कथा बघ किती विचित्र आहे
देवा तू सांग ना भविष्य किती सचित्र आहे

शिवाच्या जटेतून वाहते निर्मळ भागीरथी
शंतनुची अर्धांगिनी गंगा किती पवित्र आहे

संचयीत केले मी तुझ्या आठवणींचे क्षण
हृदयाच्या कोपऱ्यात तुझे छायाचित्र आहे

मनाच्या कोऱ्या कागदावर सुगंधित शाईने
रेखाटले तुझे मी रम्य सुरेख रेखाचित्र आहे

अप्सरा स्वर्गातील तू मेनका मी ऋषी मुनी
भंग केलं चित्त नर्तकी तू मी विश्वमित्र आहे

वैभव.आर.वाघ [V.R.WAGH]©

# लेखी आश्वासनानंतर तहसील कार्यालया समोरील ठिय्या आंदोलन मागे .दोन तास मुलीचे प्रेत तहसील कार्यालय समोर ठेवले .

**(धारुर प्रतिनिधी)** बीएसएनएलचे टॉवर घरावर पडून झालेल्या अपघातात राधाकौर गोके या ८ वर्षे या मुलीचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी दुपारी घडली होती बीएसएनएलच्या निष्काळजीपणामुळे हा प्रकार घडल्यामुळे नातेवाईकांनी रविवारी दुपारी साडेतीन वाजता तहसिल कार्यालयासमोर ठेवले होते .तहसीलदार यांच्या लेखी आश्वासनानंतर दोन तासानंतर मुलीच्या प्रेतावर अंत्यविधी करण्यात आले . धारूर येथे शनिवारी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला होता .या पावसामध्ये झालेले बीएसएनएलचे टॉवर संभाजीनगर भागातील शिकलकरी वस्तीतील आठ घरावर कोसळले होते . यामध्ये आठ जण जखमी झाले होते .त्यातील राधा कौर गोके या मुलीचा अंबाजोगाई



येथे उपचारा दरम्यान मृत्यू झाला होता .उत्तरीय तपासणीनंतर नातेवाईकांनी बीएसएनएलच्या अधिकाऱ्यावर कारवाई करावी या मागणीसाठी दुपारी साडेतीन वाजण्याच्या दरम्यान मुलीचे प्रेत तहसील कार्यालयासमोर ठेवले होते या वेळी अधिकाऱ्यांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली होती .यानंतर तहसीलदार जीवक कुमार कांबळे यांनी मयत मुलीच्या नातेवाईकांना शासनाच्या नैसर्गिक आपत्तीतून मदत, तसेच जखमींना आर्थिक मदत, ज्या घरांचे नुकसान झाले आहे त्यांना नियमानुसार मदत देण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर नातेवाईकांनी मुलीचा मृतदेहासह तहसील कार्यालयासमोर सुरू केलेले आंदोलन मागे घेतले .सायंकाळी मुलीवर अंत्यसंस्कार करण्यात आला . दुपारची वेळ होती , मोठा अनर्थ टळला शनिवारी दुपारी वादळी वाऱ्यासह पावसात बीएसएनएलचे टॉवर आठ घरावर कोसळून आठ घरा चा चुरा झाला होता . यात घरी थांबलेले लहान मुले जखमी झाले होते .यावेळी या घरातील महिला व पुरुष मजुरीच्या कामानिमित्त बाहेर गेल्यामुळे या मोठ्या अपघातातून बचावले आहेत .मजुरीसाठी बाहेर गेल्यामुळे त्यांच्यावरील मोठे संकट टळल्याचे येथील नागरिकांनी सांगितले .

# निवडणुक यंत्रणा सज्ज पण माजलगाव विधानसभा मतदार संघातील तालुका निहाय मतदार संख्येची माहितीच नाहि.?

माजलगाव. प्रतिनिधी- बीड लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर माजलगाव विधानसभा मतदार संघात सहाय्यक निवडणुक अधिकाऱ्या सह अतिरिक्त सहाय्यक निवडणुक अधिकारी तीन यांच्या नियंत्रणा खाली ३९+७क्षेत्रीय अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे पण बीड लोकसभा मतदार संघात येणाऱ्या माजलगाव विधानसभा मतदार संघातील तालुका निहाय मतदान संख्येची आकडेवारीच काढलेली नाही असे निवडणुक विभागात वर्षांनुवर्षे काम करणारे तथा जि.प.शाळेचे शिक्षक असलेले एम.व्हि.चव्हाण यांनी सांगितले आहे. यावरुन माजलगाव विधानसभा मतदार संघातील निवडणुक विभाग किती तत्परतेने निवडणुक प्रक्रिया हाताळत आहे हे लक्षात येते. असो आज होत असलेल्या लोकसभा निवडणुकीत माजलगाव विधानसभा मतदार संघातील ३७८+१मतदान केंद्रातुन ३लाख, ३८हजार,६३१मतदार त्यांच्या मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यात १लाख,७९हजार,६७०पुरुष,१ लाख,५८हजार,९६०महिला यात एकुण अंपग मतदार १२०५पैकी ७९३पुरुष,४१२मतदारांचा समावेश आहे. यासाठी माजलगाव विधानसभा मतदार संघातील तालुका निहाय मतदान केंद्रांची संख्या पुढिल प्रमाणे-माजलगाव-१७७,धारुर-१२१,वडवणी-८१. मतदान प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मतदान यंत्रे सीयू-५३६,बीयू-१३९०,व्हिव्हिपैट ५७७ वाहने एसटी बसेस -४७,मिनी बस -०९,एस्ट्राजीप -१३,क्षेत्रिय अधिकारी वाहने-३९,मास्टर ट्रेनर वाहने -०६अशी वाहने तैनात करण्यात आले आहेत. केंद्राध्यक्ष ४२०सह एकुण १२७६मतदान अधिकारी पैकी २८९महिला अधिकाऱ्यांचा समावेश आहे.अशा माहितीचे प्रसिद्ध पत्रक निवडणुक विभागाकडून माजलगाव येथील पत्रकार ग्रुप मध्ये चव्हाण यांनी पाठवले होते.तर यासाठी किती पोलीस यंत्रणा तैनात करण्यात आली आहे याचा मात्र कसलाच उल्लेख करण्यात आला नाही त्यामुळे पुनः नमुद करावे लागते कि,निवडणूक विभागात वर्षांनुवर्षे काम करणारे कर्मचाऱ्यां कडून निवडणूक अधिकाऱ्यांची दिशाभुल होत आहे.

# वृत्तबद्ध कविता ते गझल कार्यशाळा

काव्य योग काव्य संस्था पुणे व लेखन अन् मी साहित्य समूह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "वृत्तबद्ध कविता ते गझल कार्यशाळा" या दोन्ही समुहाचा पहिला उपक्रम थाटात पार पडला. यावेळी उत्कर्ष इंग्लिश मिडीयम स्कूल चे संस्थापक मा.शरदचंद्र काकडे देशमुख व कात्रज शाळेच्या प्राचार्या सौ.पुष्पा ओंबासे तसेच ज्येष्ठ साहित्यिक, गझलकार,समीक्षक मा.विजय जोशी सर यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. दोन्ही समूहाचे अध्यक्ष्यांचे कित्येक दिवसापासून जे स्वप्न होते ते पार पडले. इतरांना कविता कशी लिहावी,लय, ताल,वृत्तबद्ध, मात्रा, दीर्घ , रहस्व. तसेच गझल म्हणजे काय मतला, शेर याचा अर्थ समजून सांगितला.असे उत्तम मार्गदर्शन ज्येष्ठ साहित्यिक,गझलकार, समीक्षक मा.विजय जोशी सर यांनी केले. अर्थातच त्यांना (विजो) या नावाने ओळखले जाते.ही कार्यशाळा २१ एप्रिल २०२४ रोजी कात्रज पुणे उत्कर्ष इंग्लिश मिडीयम शाळेत पार पडली यात तब्बल ५० कवी,लेखकांनी सहभाग घेतला होता.प्रत्येकाने ह्या कार्यशाळेला उपस्थित राहून ज्ञानाचे भांडार संपादन केला.तसेच प्रत्येकाने त्यांना पडलेले प्रश्न विचारले त्या प्रश्नाने विजय जोशी सरांनी निरसन ही केली

# भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे तालुका अध्यक्ष पवन कुचेकर यांच्यावर वाढदिवसा निमित्त शुभेच्छांचा वर्षावसर्व पक्षीय नेते, कार्यकर्ते यांनी दिल्या शुभेच्छा

**(चौसाळा प्रतिनिधी)**
भारतीय जनता पार्टीचे अनुसुचित जाती मोर्चाचे बीड तालुका अध्यक्ष पवन कुचेकर यांचा जन्मदिवस चौसाळा जिल्हा परिषद गटात मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी बीड कृषी उतपन्न बाजार समितीचे संचालक शरद झोडगे, जेष्ठ नेते अशोक (बप्पा) सोनवणे, युवा क्रांतीचे प्रणेते विजय राजे शिंदे, चौसाळा ग्रामपंचायत सदस्य अमोल कांबळे, राष्ट्रवादीचे युवा नेते पंजाब वाघमारे, सावता परिषदेचे बीड तालुका अध्यक्ष सुधीर चौधरी, भाजपा अल्पसंख्याक आघाडीचे बीड तालुका अध्यक्ष सलिम जहागिरदार, ईस्माईल शेख, सुधाकर गुजांळ, प्रदीप (भाऊ) जोगदंड, आरूण सोनवणे, विजय (दादा) सोनवणे, सचिन चव्हाण, प्रविण सोनवणे, चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक कुचेकर, महाराणा प्रताप प्रतिष्ठाणाचे अध्यक्ष करण परदेशी, एकता ग्रुपचे अध्यक्ष स्वप्नील सोनवणे, सतिष वाघमारे, लखन सोनवणे, समाधान पोळ, कृष्णा चव्हाण, लखन जोगदंड, शंकर सोनवणे, वैभव सोनवणे, साहील सोनवणे, गणेश सोनवणे, मच्छींद्र गायकवाड, बुड्ढाभाई शेख, अनिकेत हारे यांच्यासह विविध राजकिय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.



संपादकीय

## अन्न , वस्त्र आणि निवारा

सर्वसामान्यत: माणसाच्या तीन प्राथमिक गरजा आहेत. अन्न, वस्त्र आणि निवारा. त्यातील पहिली गरज म्हणजे अन्न. साधारणत: माणूस जगण्यासाठी खातो , परंतु काही माणसे अशी असतात जी खाण्यासाठी जगतात आणि त्यांनाच आपण खवय्ये म्हणतो. अशाच अगदी जातीच्या खवय्यांसाठी प्रा. प्रज्ञा पंडित यांचे ' भारतीय खाद्यसंस्कृती ' हे पुस्तक आहे. प्रा. प्रज्ञा पंडित यांचे ' भारतीय खाद्यसंस्कृती ' हे पुस्तक २०२२ मध्ये शॉपिझेन या प्रकाशनाने प्रकाशित केले. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत त्या म्हणतात , " आवडी निवडीनुसार कविता, कथा, कादंबरी, गूढ कथा, विनोदी लेखन यानुसार वाचक वर्ग विभागला जातोच पण जेवण , पाककृती यावरचे पुस्तक मात्र प्रत्येक सुजाण वाचक आपल्या संग्रही ठेवतोच कारण ते कधीही कालबाह्य ठरत नाही, त्यातील माहिती ही कधीही कालातीत होत नाही. " त्यांचे हे मत खरे आहे. एखादा नवीन पदार्थ करायचा झाल्यास भारतीय गृहिणी ही पाककृतींच्या पुस्तकाचा आधार घेते. या प्रकारच्या पुस्तकांचा स्वयंपाकघरात रांधणाऱ्या अनेक हातांना आधार वाटतो.

आपला भारत देश हा प्राचीन संस्कृतीचा वारसा लाभलेला देश आहे. अनेक संस्कृती इथे हातात हात घालून नांदतात. भारत देश जसा संस्कृतीने ओळखला जातो तसाच तो येथील खाद्यजीवनानेही ओळखला जातो, किंबहुना येथील खाद्यही संस्कृतीने नटलेले आहे.

या अशाच भारतीय राज्यांच्या खाद्यसंस्कृतीची ओळख आपल्याला या पुस्तकातून होते. महाराष्ट्र, गुजरात, पंजाब, गोवा, कर्नाटक अशा अनेक राज्यांतील खाद्यपरंपरा गुण्यागोविंदाने या पुस्तकात नांदतात.

सुरुवात होते ती महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृती पासून. आपला महाराष्ट्र हा अनेक चोखंदळ खवय्यांसाठी आश्रयाचे स्थान आहे. महाराष्ट्रात जशी कोसाकोसावर बोली बदलते, तशा खाण्यापिण्याच्या सवयी बदलतात. पूर्व महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्र या भागांनी त्यांची अस्सल चव राखून ठेवली आहे. या लेखातून अगदी घरबसल्या संपूर्ण महाराष्ट्रातील खाद्यपदार्थांची चव जिभेवर रेंगाळल्याचा भास होतो आणि भूक चाळवली जातेच.

प्रत्येक प्रदेशातील प्रदेश वैशिष्ट्यांसह तेथील विशेष पदार्थ , त्यामागील संस्कृती या लेखात मांडली गेली आहे.

यानंतर महाराष्ट्रात रेंगाळणारे आपले मन थेट गुजरातात पोहोचते आणि ' चलो जमवा ' करत गुजराथी थाळीचा आस्वाद घेण्यास सज्ज होते. गुजराथी पदार्थांनी स्वत:ची वेगळी अशी एक चव सिद्ध केली आहे, जी या लेखाच्या निमित्ताने चाखायला मिळते. गुजरात जरी एक राज्य असले तरीही तिथेही गुजराती , काठीयावाडी, सुरती अशा जेवणाच्या पद्धती आहेत. या लेखातून खाद्यपदार्थ आणि त्या खाद्यपदार्थांशी निगडीत तेथील संस्कृती याची उत्तम सांगड घालण्यात आली आहे.

## निसर्ग आणि सहजीवन विवाह विच्छेदाचं उच्चाटन

जागतिक पर्यावरण दिनी ज्याप्रमाणे आपण वृक्षावरोपण तसेच लहान रोपांची लागवड करुन आपल्या परिसरात पर्यावरणाचे संवर्धन करतो, त्याचप्रमाणे आपल्या सभोवतालच्या प्राणीमात्रांचे, पक्ष्यांचे दाणे, पाणी, चारा देऊन त्यांचे संगोपन करत असतो. आपणही सर्व मनुष्यप्राणी, ह्या निसर्गाचा एक घटक आहोत. सर्व प्राणीमात्रांपेक्षा सर्वश्रेष्ठ अशी बुद्धिमत्ता देवाने माणसाला बहाल केली आहे, तरीही आपण माणसं आपल्या परस्परांतील नातं टिकवण्यासाठी, त्या नात्याला नव्यानं खतपाणी घालून त्याचं संवर्धन करण्यासाठी काही प्रयत्न करतो कां? कोणत्याही नात्याला नवसंजीवनी मिळते ती सकारात्मक विचाराने, सद् भावनेच्या सिंचनाने व प्रेमपूर्वक स्विकाराने. आपण डोळसपणे ह्या सृष्टीकडे पाहिलं तर उमजेल की, आपण माणसं बुध्दी असूनही विचारपूर्वक न वागता, माणसा-माणसातल्या नात्याला दुरावतोय. आज आपल्या समाजाला कुटुंब व्यवस्था टिकवून सामाजिक स्वास्थ्य जोपासण्याची नितांत आवश्यकता आहे. आजच्या 'यूज-अँड-थ्रो'च्या युगात नातंही किती सहजपणे झिडकारलं जातंय. घटस्फोटाची वाढती संख्या व कोलमडणारी कुटुंब व्यवस्था पाहिली की वाटतं, नव्यानं ह्या नात्याकडे व सहजीवनाशी संबंधित अन्य नात्यांकडे तसेच जगाशी जोडल्या जाणाऱ्या इतर भावनिक नातेसंबंधांकडे निसर्गाच्या दृष्टीने पाहिलं तर आपण माणसंही एकमेकांची शक्ति बनू शकतो.

एकमेकांची एकजूट दर्शविणारा मेंढ्यांचा, गाई-गुरांचा कळप, आकाशात एकमेकांच्या साथीने विहार करणाऱ्या पक्ष्यांचा थवा, फुलांचे ताटवे, बहरलेले वृक्ष, टवटवीत दिसणाऱ्या वेली, जलाशयातील आगळंवेगळं नेत्रसुख देणारे विविधरंगी जलचर प्राणी. हे सारे त्यांच्या विभिन्नतेतूनही एकता दाखवतात. परस्परांच्या विश्वात दखल न देताही एकमेकांना पूरक राहून निसर्गाचा समतोल सांभाळतात. निसर्ग नियमानुसार मनुष्याची वाढ, ऋतुमानाप्रमाणे होणारे बदल, सूर्याचे धरतीला प्रकाशमान करण्याचे, पावसाने न्हाऊन चिंब करण्याचे व हवेचे वहन करण्याचे कार्य युगानुयुगे अविरत चालू आहे. मानवाने आपल्या प्रगल्भ बुद्धिमत्तेने, अत्याधुनिक तंत्रज्ञानाने क्रांती केली; संगणक युगात वेगवेगळ्या प्रसार माध्यमांनी जरी जग जोडलं गेलं असलं, तरी प्रत्यक्षात मात्र माणसांची नाती व प्रत्यक्ष भेटी-गाठी दुरावल्या आहेत. वर्तमानपत्रातल्या अत्याचाराच्या, अमानवी कृत्यांच्या, नात्यांची चिरफाड करणाऱ्या बातम्या वाचल्या की मन विषण्ण होतं. देवाने आपल्याला दोन हात दिले आहेत, ते सत्कर्म करण्यासाठी, परस्परांना साथ देण्यासाठी आणि आपल्या वाणीचा उपयोग सुसंवादाने जगाशी नाते जोडून, एकमेकांत आपुलकी वाढवण्यासाठी. अविचारी माणसं आपली अर्धी अधिक उर्जा ही वायफळ गोष्टींवर चर्चा करण्यात, दुसऱ्यांवर टिका करण्यात, वाद-विवादात व दुष्कृत्य करण्यात वापरून, स्वत:ची आणि पर्यायाने समाजाची हानी करुन घेत आहेत. वैवाहिक जीवनात जोडीदारांनी आपले 'इगो' जपण्यासाठी टोकाची भूमिका घेतल्यामुळे कौटुंबिक घडी विस्कळीत झाली आहे. भाऊबंदकीत व इतरही नात्यांत संपत्ती, जमीन-जुमला व पैशावरून तंटे व वादविवाद सुरुच असतात व ते न्यायालयात पिढ्या न पिढ्या चालू राहतात. गंमत म्हणजे मूक पशू-पक्ष्यांच्या विश्वात केवळ चोच, पंख व पायांच्या बळावर, नैसर्गिक साधनसंपत्तीच्या आधारे त्यांचे नित्य व्यवहार पैशाशिवायही सुरळीत सुरु असतात. तेही आनंदाने जगाला प्रसन्नता, सुंदरता बहाल करत असतात आणि विशेष म्हणजे त्यांच्या जगात कोणतेही 'घोटाळे' न करता ! म्हणूनच की काय, आपल्याला कोणताही प्राणी, पक्षी, फुले-पाने सजीव असूनही माणसांप्रमाणे दु:खी व तणावपूर्ण दिसत नाहीत. चिखलात राहूनही न कुरकुरता कमळ सौंदर्याने खुलते. काट्यांमध्ये राहूनही गुलाब प्रसन्नतेने फुलतो. आपण माणसं मात्र आपल्या दु:खांचा केवढा बाऊ करतो. दुसऱ्यांकडून अवाजवी अपेक्षा ठेवल्यामुळे आपण दु:खालाच कवटाळून बसतो. म्हणूनच आपल्याला सुख जवाएवढे व दु:ख पर्वताएवढे दिसते. निर्मळ निसर्ग, निरपेक्ष प्रेम व समाधान देणारे पशु-पक्षी पाहिले की वाटतं, भौतिक सुखाच्या मागे धावणाऱ्या, यंत्र-सामुग्रीसह जीवन व्यतीत करणाऱ्या, प्रसार माध्यमांच्या व डिजिटल गॅजेटच्या मोहजालात अडकणाऱ्या माणसा, भरभरुन देणाऱ्या या निसर्गाकडे डोळसपणे पाहून घटकाभर श्वास घे! निसर्गाच्या हिरव्या कुशीत विसावा घे, खळखळ वाहणाऱ्या पाण्यात, निर्झर झऱ्यात, कोसळणाऱ्या धबधब्यांत स्वत:ला झोकून दे! रंगीबेरंगी फुलपाखरांकडे नुसतं कुतूहलाने पाहिलं तरी मनाला प्रसन्न वाटतं. 'मन पाखरू पाखरू' खुणावत आपल्यालाही त्यांच्यासारखं क्षणांत आकाशी उडणारी अन् क्षणांत भुईवर परतून येणारी, इकडे-तिकडे भिरभिरणारी फुलपाखरे वेगळाच आनंद देतात. ही पाखरं जणू आपल्याला त्यांच्यासारखं मन हलकं-फुलकं, ताजं-तवानं ठेवण्याचा संदेश देतात. जीवन सुखी, समाधानी व सुसह्य करण्याचा कानमंत्र ऐकायचा आणि अनुभवायचा आहे कां? पशु-पक्ष्यांच्या रमणीय जगतातील दाखले ऐकत, निसर्गात रममाण करणारा, त्यांचे आपल्या सहजीवनाशी महत्व सांगणारा, मनमोराचा पिसारा फुलविणारा हा कार्यक्रम तुम्हाला नक्की आवडेल. निसर्ग देवतेचे स्मरण करून, भूमातेला वंदन करुन, समस्त वाचकांसाठी मी माझं उर्वरित मनोगत माझ्या 'निसर्ग आणि सहजीवन' ह्या कार्यक्रमात मांडते. त्यासाठी तुमच्या मंडळातर्फे, सार्वजनिक संस्थेतर्फे, बचत गट-युवक-युवती गटातर्फे मला खालील मोबाईल (व्हॉट्स अप) क्रमांकावर संपर्क साधावा. 'निसर्ग आणि सहजीवन' निसर्गाप्रमाणेच मन प्रसन्न करणारा, सकारात्मक विचार देणारा, सहजीवनावरील कवितांचा निखळ आनंद देणारा, एक आगळा वेगळा अभिवाचन व सुसंवादाचा कार्यक्रम! वैवाहिक जीवन समृद्ध करणारे सादरीकरण ! 'घटस्फोट टाळा, विवाह वाचवा'

संपर्क : निसर्गप्रेमी ॲड. सुजाता त्रिंबककर टिपणीस
Mob/What's App: 9870324965
Email – sujatatipnis@gmail.com

# सिरसदेवीत एका महिलेला अज्ञात कारने उडवले, महिलेचा जागीच मृत्यू

वादळवार्ता/गेवराई

गेवराई तालुक्यातील सिरसदेवी फाटा येते हायवे क्र 61 वर काल दि.11/05/2024 शनिवार रोजी एका महिलेला अज्ञात कारणे जोराची धडक दिल्याने त्या महिलेचा जागीच मृत्यू झाल्याची घटना रात्री 10 वाजण्याच्या सुमारास घडली असून त्या महिलेला बीड जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते परंतु महिलेचा जागीच मृत्यू झाल्यामुळे डॉक्टरांनी मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. सविस्तर माहिती अशी कि काल दि 11 शनिवार रोजी माजलगाव कडून भरधाव येणाऱ्या कार ने मुद्दकाबाई दिलीप शेळमकर अंदाजे वय (55) वर्ष रा सिरसदेवी ता. गेवराई अपघातात मृत्यू झालेल्या महिलेचे नाव असून या महिलेला तीन मुले आहेत तसेच ती महिला विधवा असल्याची माहिती आहे. या महिलेला माजलगाव कडून गेवराई कडे जाणाऱ्या अज्ञात कार ने जोराची धडक दिल्याने ही महिला हवेत उडून खाली रोडवर पडल्याने तिला गंभीर मार लागल्याने त्या महिलेचा जागीच मृत्यू झाला असल्याची माहिती आहे.

ही महिला रात्री आपल्या घरून दळण आणण्यासाठी सिरसदेवी फाट्यावर पिठाच्या गिरणीकडे गेली होती तसेच ती परत आपले दळण घेऊन घराकडे रोड क्रॉस करून निघाली असताना भरधाव वेगाने येणाऱ्या कारणे तिला जोराची धडक दिल्या मुळे तिला गंभीर मार लागल्याने आजूबाजूच्या लोकांनी तिला उपचारासाठी बीड रुग्णालयात पाठवले तसेच लोकांनी, युवकांनी त्या कारचा पाठलाग केला परंतु ती कार हाती लागली नाही तसेच गडी येथे काही युवकांना फोनवर अपघाताची माहिती देण्यात आली असता तेथे ती अज्ञात कार अडवताना त्या कार चालकाने लोकांच्या अंगावर गाडी घातली तसेच गाडी न थांबवल्याने ना विलाजाने दगड मारून गाडीचे काच फोडण्यात आले परंतु ती कार हाती लागली नाही अशी माहिती आहे.



तसेच या घटनेची माहिती कोणीही हायवे पोलीस किंवा स्थानिक पोलीस स्टेशन ला दिली नाही त्यामुळे या घटनेची माहिती पोलीस स्टेशन ला नाही तसेच या महिलेचा जागीच मृत्यू झाल्याने सिरसदेवी परिसरात हळ हळ व्यक्त होत आहे.तसेच आज मातृ दिन असल्यामुळे आपल्या आईचा अंतविधी मातृदिना दिवशी आपल्या मुलांना करावा लागत आहे ही वेळ कोणावरही येऊ नये अशी चर्चा नागरिकांमधून होत आहे.

# गंगापूर वैजापूर तालुक्याला नां.म.कालव्यातून पाणी सोडावे या साठी जलसमाधी घेणाऱ्या आंदोलकांना पोलिसांनी घेतले ताब्यात

दैनिक वादळ वार्ता
गंगापूर/प्रा संजय तुपे

गंगापूर वैजापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी जलसमाधीचा इशारा देवुनही नांदूर मधमेश्वर कालव्यात पाणी न सोडल्याने जलसमाधी आंदोलनाला जाणाऱ्या २०० ते ३०० शेतकरी महिला व पुरुषांना येवला व निफाड पोलीसांनी पकडून ताब्यात घेतले असता शेतकऱ्यांनी घोषणा बाजी केली. गंगापूर वैजापूर तालुक्यात उन्हाचा तडाखा व पाणी पातळी कमी झाल्याने फळबाग,जनावरे व पिण्याच्या पाण्यासाठी नांदूर- मधमेश्वर कालव्यात तत्काळ पाणी सोडावे,अशी मागणी करीत गंगापूर आणि वैजापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी गेल्या आठ दिवसांपासून वैजापूर नामका कार्यालयासमोर उपोषण सुरु केले होते, कालव्यात पाणी न सोडल्याने ११ मे रोजी नाशिक येथील मुकणे व भाम धरणात जलसमाधी घेण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला होता. त्या नुसार चारशे ते पाचशे शेतकरी ११ मे रोजी जलसमाधी आंदोलनासाठी जात असताना येवला पोलिसांनी गंगापूर तालुक्यातील मांजरी, माहुली, मुद्देशवाडगांव,वाहेगांव, शिंदेवाडी, शिंगी, पिंपरी आदी गावांतील २०० ते ३०० शेतकऱ्यांच्या गाड्या अडवून महीला व पुरुषांना ताब्यात घेऊन गंगापूर, येवला व निफाड पोलिस स्टेशनच्या आवारात बंदीस्त केले असता तेथे शेतकऱ्यांनी पाणी आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचे अशा घोषणा दिल्या. पुढे पोलिस काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# रक्तदान शिबिरासारख्या समाजोपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करणे ही काळाची गरज - डॉ गोपाळ चौसाळकर,

## परशुराम जन्मोत्सव निमित्त पेशवा प्रतिष्ठान तर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन, ३९ जणांचे रक्तदान

(अंबाजोगाई प्रतिनिधी) येथील पेशवा प्रतिष्ठान तर्फे परशुराम जन्मोत्सव निमित्त आयोजित केलेले रक्तदान शिबिर हे काळाची गरज असल्याचे मत डॉ गोपाळ चौसाळकर यांनी व्यक्त केले. ते रक्तदान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी डॉ सुधीर धर्मपात्रे, डॉ शशांक पाठक, संतोष कचरे, राहुल कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. या शिबिरात ३९ जणांनी रक्तदान केले. पेशवा प्रतिष्ठान तर्फे २००९ पासून भगवान परशुराम जन्मोत्सव निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येत असून आतापर्यंत ९०० पेक्षा जास्त रक्तदान झाले असल्याची माहिती डॉ महेश अकोलकर यांनी दिली. या शिबिरात डॉ महेश अकोलकर शैलेश दीक्षित,ममता दीक्षित अविनाश लहुरीकर,अथर्व जड, राहुल कुलकर्णी,रेवती कुलकर्णी मुक्ता राहुल कुलकर्णी, पार्थ कुलकर्णी,प्रमोद नांदगावकर डॉ संकेत तोरंबेकर,केदार वारकरी विशाल जहागीरदार,केदार दामोशन,सूरज सांगवीकर ,विनय बाभूळगावकर दीपक कुलकर्णी राडिकर ,सर्वेश सेलूकर,डॉ मिलिंद कळंबकर आश्लेषा कलंबकर नरेंद्र बर्दापूरकर सारंग भातलवंडे शंकर निकम,राघव कुलकर्णी,डॉ प्रिया मुळे,कल्पना लातूरकर,मधुरा लातूरकर,शिरीष हिरळकर,आदित्य राखे, गणेश देशमुख, वामन खोत,विनोद खंडागळे, अविनाश आकाते सुजित दीक्षित, संजय कुलकर्णी, मनीषा कुलकर्णी कल्याणी कुलकर्णी, अनघा लहूरीकर , रोहिणी पाठक यांनी रक्तदान केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी पेशवा प्रतिष्ठान चे राहुल कुलकर्णी, विवेक बाभुळगावकर, वैभव देशपांडे, राघव कुलकर्णी, प्रतीक्षा जोशी, ज्योती कुलकर्णी,तन्मय जोशी, आयुष लहुरीकर यांनी पुढाकार घेतला. शिबिरासाठी रक्तपेढीत कार्यरत डॉ रिया बागडे, शशिकांत पारखी, आनंद सिताप, जगदीश रामदासी, वाल्मीक कांबळे,शामली गोबरे, मुस्कान सय्यद यांनी सहकार्य केले.



## लिंबागणेश सर्कल मध्ये तुतारीच वाजणार ; सर्वसामान्य मतदार बजरंग बाप्पाच्या पाठीशी



(लिंबागणेश प्रतिनिधी) बीड तालुक्यातील बालाघाटावरील लिंबागणेश सर्कल मधील सर्वसामान्य मतदार महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या पाठीशी असल्याने तुतारीच वाजणार असल्याचे सर्वसामान्य मतदारातुन बोलले जात असुन बजरंग बप्पा यांनी बालाघाटावरील लिंबागणेश सर्कल मधील लिंबागणेश, मोरगाव,मुळुक,मसेवाडी , पोखरी,पिंपरनई,सोमनाथवाडी,बेलगाव आदि. गावांमध्ये ग्रामस्थांच्या भेटीगाठी घेतल्याने या भागातुन त्यांना मोठ्या प्रमाणावर मताधिक्य देण्याचे आश्वासन ग्रामस्थांनी दिले आहे.याचवेळी प्रमुख विरोधी असणा-या भाजपा उमेदवारांच्या गाठीभेटी न झाल्याने त्यांचा प्रचार फिका पडल्याचे दिसून येत आहे. सुरेश नवले आणि बाळासाहेब मोरे यांच्या कॉर्नर सभांचा जोर लिंबागणेश सर्कलमध्ये शिवशक्ती -भिमशक्ती विचारमंचचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांनी माजी मंत्री सुरेश नवले यांच्या सोबत बालाघाटा वरील लिंबागणेश,चौसाळा, अंजनवती ,बोरखेड आदि गावांमध्ये कॉर्नर सभा घेत शेतकरी पुत्र बजरंग बप्पा यांना मोठ्या संख्येने मताधिक्य देत लोकसभेत पाठविण्याचे आवाहन केले असुन सभांना ग्रामस्थांनी मोठा प्रतिसाद दिला आहे. जरांगे पाटलांच्या आवाहनाला लिंबागणेशकरांचा प्रतिसाद:- डॉ.गणेश ढवळे मराठा समाजाला कुणबी प्रवर्गातुन आरक्षण मिळावे यासाठी लिंबागणेश सर्कल मधील साखळी उपोषणाचे लिंबागणेश केंद्रबिंदू होते.बजरंग बप्पा यांनी जाहिर रित्या जेव्हा मी खासदार म्हणून निवडून जाईल तेव्हा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांची मराठा समाजाची जी मागणी असेल तीच मागणी मी दिल्लीच्या सभागृहात मांडेल

# काँग्रेसचे जेष्ठ नेते बाळासाहेब शिवरकर यांनी घेतली कामगार नेते महेंद्र घरत यांची भेट.

**उरण/विठ्ठल ममताबादे**

माजी मंत्री,काँग्रेसचे जेष्ठ नेते बाळासाहेब शिवरकर यांनी रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांची शेलघर येथील निवास्थानी भेट घेऊन मावळ लोकसभेचा आढावा घेतला. यावेळी जिल्हा अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी शिवरकर यांना सांगितले कि उरण विधानसभा मतदार संघातून किमान ४० ते ५० हजार मतांची आघाडी महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरेंना देणार असल्याचा विश्वास दिला. यावेळी बाळासाहेब शिवरकर यांचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी स्वागत केले. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष आखलाक सिलोत्री, रायगड जिल्हा उपाध्यक्ष किरिट पाटील , जिल्हा सरचिटणीस वसंत म्हात्रे व मोठया संख्येने काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.



# माता न तू वैरिणी.. पोटच्या दोन चिमुकल्यांचा जीव घेऊन आईचा आत्महत्येचा प्रयत्न

## अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर येथिल घटना

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

स्वयंपाक जास्त का केलास असे सासूने विचारल्याचा राग आल्याने विवाहितेने स्वतःच्या दोन्ही लेकरांना विषारी औषध पाजवून त्यांचा जीव घेत नंतर स्वतःही विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची खळबळजनक घटना अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर येथे दि.१० मे शुक्रवार रोजी रात्री घडली. कौशल्या भीमराव दोडतले (वय २३), रा.टेकडी गल्ली, बर्दापूर ता.अंबाजोगाई असे त्या विवाहितेचे नाव आहे. शुक्रवारी रात्री तिचा पती भीमराव हा ना.धनंजय मुंडे यांच्या सभेला गेला होता. यावेळी घरात असलेल्या सासूने स्वयंपाक जास्त का केलास असे कौशल्याला विचारले. त्यामुळे रागात आलेली कौशल्याने मुलगा कार्तिक (वय २) आणि मुलगी प्रांजल (वय ३) यांना घेऊन स्वतःच्या खोलीत गेली. तिथे तिने दोन्ही मुलांना विषारी औषध पाजविले. सभा संपून भीमराव घरी आल्यानंतर आईने त्याला कौशल्या रुसून खोलीत बसल्याचे सांगितले. त्यानंतर भीमराव खोलीत गेला असता त्यास मुलांच्या नाकाला फेस आल्याचे दिसले. त्यावर मुलांच्या नाकाला व्हॅसलिन लावल्याचे कौशल्याने सांगितले. परंतु, मुलांच्या नाकातून रक्तही येत असल्याने आणि मुलांची काहीच हालचाल दिसत नसल्याने घाबरलेल्या भीमरावने मुलांना खांद्यावर घेत बाहेर आणले आणि आरडाओरडा करून गल्लीतील लोकांना बोलावले. यावेळी कौशल्याने वरच्या खोलीत जाऊन विषारी औषध प्राशन केले. भीमराव आणि इतरांनी तिघांनाही घेऊन लातूरच्या खाजगी रुग्णालयात दाखल केले. तिथे डॉक्टरांनी तपासून कार्तिक आणि प्रांजल यांना मयत घोषित केले. तर, कौशल्यावर उपचार असून तिची प्रकृती स्थिर आहे. याप्रकरणी भीमरावच्या फिर्यादीवरून पत्नी कौशल्या हिच्या विरोधात बर्दापूर पोलीस ठाण्यात कलम ३०२ अन्वये बर्दापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक ठाकूर करत आहे.

# जेष्ठ पत्रकार कै.शशिकांत महाजन आदर्श पत्रकार गौरव पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन.

**वादळवार्ता/कोल्हापूर**

पाडळी (केसे )तालुका कराड येथील आदर्शमाता कांताबाई बाबुराव मोहिते प्रतिष्ठानच्या वतीने पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या पत्रकारांचा जेष्ठ पत्रकार कै.शशिकांत महाजन आदर्श पत्रकार गौरव पुरस्कार सन्मान करण्यात येणार असून इच्छुक पत्रकारांनी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन संस्थेचे मार्गदर्शक आणि ज्येष्ठ पत्रकार कैलासवासी शशिकांत शंकरराव महाजन पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष संपतराव मोहिते यांनी केले आहे.

सांगली जिल्ह्यातील मूळ तडसर वांगी गावचे सुपुत्र कै.शशिकांत शंकर महाजन यांनी पत्रकार क्षेत्रात कराड तालुक्यासह सातारा जिल्ह्यात उल्लेखनीय काम केले होते. आजही काही पत्रकार त्यांच्याच आदर्श डोळ्यासमोर ठेवून पत्रकारिता करीत आहे. ज्येष्ठ पत्रकार शशिकांत महाजन यांचा तृतीय पुण्यस्मरण दिन ४ मे २०२४ रोजी झाला. त्यांच्या कार्याचे नाव सदैव पत्रकारिता क्षेत्रात आजरावर व्हावं या प्रामाणिक उद्देशाने त्यादिवशी आदर्शमाता प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विश्वास मोहिते यांनी पुण्यस्मरण दिनाचे औचित्य साधून ज्येष्ठ पत्रकार कैलासवासी शशिकांत शंकरराव महाजन यांच्या नावाने पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय काम करणारे व्यक्तींना हा पुरस्कार देऊन गौरव करणार असल्याचे जाहीर केले.

या अनुषंगाने पत्रकारिता क्षेत्रात काम करणाऱ्या पत्रकारांचा प्रतिवर्षी यथोचित सत्कार करण्यात येणार आहे. चालू वर्षापासून हे पुरस्कार देणारा असून इच्छुकांनी प्रस्ताव पाठवावेत असे आवाहन आदर्श माता कांताबाई बाबुराव मोहिते प्रतिष्ठानचे मार्गदर्शक आणि कैलासवासी शशिकांत शंकरराव महाजन आदर्श पत्रकार निवड समितीचे अध्यक्ष संपतराव मोहिते यांनी केले आहे. हे प्रस्ताव मार्गदर्शक संपतराव मोहिते आदर्श माता कांताबाई बाबुराव मोहिते प्रतिष्ठान पाडळी केसे तालुका कराड जिल्हा सातारा मोबाईल नंबर ९७६३२०१०५६ या पत्त्यावर ती पाठवावे असेही पत्रकात नमूद केले आहे.



# वाकडी येथे वृध्द महिलेच्या खून प्रकरणी ग्रामस्थांच्या वतीने तिन तास रस्ता रोको जिल्हा पोलीस अधीक्षक रेड्डी साहेब यांची घटनास्थळी पाहणी

## अप्पर पोलिस अधीक्षक कविता नेटकर उपविभागीय पोलीस अधिकारी धनजय वेरुळे याच्याकडून चौकशी

**दैनिक वादळ वार्ता**
**जळगाव/संजय जटाळे**

दिनांक .१२/०५/०२४ वाकडी .ता. जामनेर येथे ९० वर्षीय वृध्द राधाबाई लालचंद परदेशी या महिलेचा दि १२ रोजी राहत्या घरात खुन झाल्याचा संशय असतांना व शव विछेदन साठी जळगाव येथील सरकारी रुग्णालयात दाखल असतांना महिलेच्या घराला फत्तेपूर पोलिसांच्या वतीने सरक्षंण न दिल्याने पोलीस प्रशासना बाबतीत रोष व्यक्त करत वाकडी ग्रामस्थ व महिलांच्या वतीने जामनेर ते फत्तेपूर रस्त्यावर तिन तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले उपविभागीय अधिकारी धनजय येरुडे याच्याकडून आरोपी ला आठ दिवसात अटक करू व गावातील दारूबंदी करण्यात येईल असे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले राधाबाई परदेशी याच्या खूनाच्या सशयावरुन महिला वर्गात भीती चे वातावरण निर्माण झाली असल्याने महिला वर्ग शेतात काम करण्यास व गावात निर्भय पने वावरताना भीती निर्माण झाली आहे गावात मोठ्या प्रमाणात दारु विक्री होत आहे अवैध धंदे वाढल्याने हा प्रकार झाला असल्याचा आरोप महिलां च्या वतीने उपविभागीय अधिकारी धनजय येरुडे याच्या समोर करण्यात आला महिलाच्या वतीने आरोपी ला आठ दिवसाच्या आत अटक करा व गावातील दारु बंदी करण्यात यावी अशी आम्हाला लेखि आश्वासन देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली असता सर्वाचे समोर आरोपी ला अटक व दारूबंदी चे लेखि आश्वासन देवून वाचून दाखवण्यात आले अप्पर पोलीस अधीक्षक कविता नेटकर यांनी घटनास्थळी भेट देवून महिलेच्या घराची व मुलाच्या घराची पाहणी करून मयत महिला राधा बाईच्या आजूबाजूच्या घरातील महिला पुरुषां कडून माहिती जाणून घेतली ग्रामस्थांच्या मागणी नुसार श्वास पथकाला पाचारण करून तपासणी करण्यात आली यावेळी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता सचिन सानप सहाय्यक पोलिस निरीक्षक याच्या सह दिलीप पाटील सहाय्यक पोलीस निरीक्षक .संजय सुस्ते व कर्मचारी वाकडी चे पोलीस पाटील



घनश्याम पाटील व मोठ्या प्रमाणात महिला ग्रामस्थांनी गर्दी करण्यात आली होती दुपारी चार वाजेच्या दरम्यान पोलिसाच्या उपस्थितीत राधाबाई परदेशी याच्या दहन विधी पार पडला


# बौद्ध धर्माच्या इतिहासावर एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

(बीड प्रतिनिधी) ज्ञानसागर बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने दिनांक 10 मे 2024 रोजी बीड येथे एक दिवसीय बौद्ध धर्माच्या इतिहासावरती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. आयोजित कार्यशाळेस भंतेजी महेशजी थेरो, धम्मानंद थेरो, विजय थेरो, सिद्धांत थेरो इत्यादी प्रमुख भंतेजींची उपस्थिती होती. कार्यशाळेत उपस्थित सर्व उपासक उपासिका यांना मार्गदर्शन करताना भंतेजी सिद्धांत थेरो म्हणाले की, बौद्ध धर्माची सुरुवात भारतात सिद्धार्थ गौतमाने केली असे मानले जाते. सिद्धार्थचा जन्म झाला इ.स.पू. पाचव्या शतकाच्या आसपास दक्षिण नेपाळमधील एका कुळातील आदिवासी प्रमुखाला. त्यानुसार बौद्ध साहित्यात तो घरी राहिला तर राजा होईल असे भाकीत केले होते किंवा महान ऋषी आणि मानवतेचा तारणहार जर तो सोडला. सिद्धार्थच्या वडिलांना आपल्या मुलाने सोडून जावे असे वाटत नव्हते. आपल्या मुलाने राजा व्हावे आणि त्याच्या पावलावर पाऊल टाकावे अशी त्यांची इच्छा होती. कथा पुढे जात असताना, सिद्धार्थ श्रीमंती आणि ऐषो आरामांनी वेढलेला मोठा झाला. त्याला फक्त सुखच माहीत होते. राजवाडे आणि त्याच्या वडिलांनी कोणत्याही वेदना किंवा कुरूपतेपासून संरक्षण केले. जेणेकरून ते तसे करणार नाहीत मानवी दुःखाचा अनुभव घ्या. पण सिद्धार्थ त्याच्या चैनीच्या जीवनाने अस्वस्थ झाला.

# गुरुवर्य महादेवानंदजी भारती महाराज यांचा अभिष्टचिंतन सोहळा

**वादळवार्ता/पिंपळवंडी**

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थांनचे मठाधिपती श्री.स्वामी ह.भ.प.गुरुवर्य महादेवानंदजी भारती महाराज यांचा अभिष्टचिंतन सोहळा प्रतिवर्षाप्रमाणे दि.१५ मे २०२४ बुधवार रोजी येथील श्री.स्वामी अमृत भारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात व भव्य-दिव्य साजरा करण्याचे आयोजन केले असून या कार्यक्रमाला परिसरातील सर्व भाविक-भक्तांनी उपस्थित राहावे अशी विनंती महादेवानंद



भारती महाराज भक्त परिवार सर्व तरुण मंडळ तसेच समस्त पिंपळवंडी ग्रामस्थ व पंचक्रोशी मंडळ यांनी केली आहे. यानिमित्त दुपारी ४ ते ६ या वेळेत महंत महादेवानंदजी महाराज यांची श्री क्षेत्र अश्वत्थलिंग मंदिरापासून कार्यक्रम स्थळापर्यंत भव्य-दिव्य मिरवणूक काढण्यात येऊन सायंकाळी ६ ते ७ वेळेत सत्कार समारंभ संपन्न होणार आहे. तसेच ७ ते ९ दरम्यान जमलेल्या भाविक-भक्तांसाठी भोजन ठेवण्यात आले आहे.तसेच रात्री ९ ते ११ या वेळेत ह.भ.प.अमृत महाराज जोशी नवगण राजुरी यांच्या किर्तनाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे.

# महावितरण वीजेची लोंबकळणा-या तारा व उघड्या रोहित्रांमुळे अपघाताची दाट शक्यता :- डॉ.गणेश ढवळे

**(बीड प्रतिनिधी)**

पावसाळ्यात वीजग्राहकांना अखंडीत व योग्य दाबाने वीजपुरवठा सातत्याने मिळावा याकरिता बीड जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील वीजेची मान्सुनपुर्व देखभाल व दुरूस्तीची रोहित्रांची तपासणी,अर्थिंग व टर्मिनल कनेक्शन चेक करणे,वीजतारांजवळील झाडांच्या फांद्यांची छाटणी,लोंबकळणा-या तारांचे झोल काढणे तसेच उघड्यावरील रोहित्रांची सुरक्षितता आदि मान्सुनपुर्व देखभाल व दुरूस्तीची कामे मे महिन्याच्या उत्तरार्धात तातडीने करण्यात यावीत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड, कार्यकारी अभियंता महावितरण विभाग बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, ऊर्जामंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना निवेदनाद्वारे केली आहे. सविस्तर माहितीस्तव सध्या महावितरणच्या वीज वितरण यंत्रणेतील बहुतांश सामग्री उघड्यावर असल्याने वातावरणात होणा-या बदलांचा प्रतिकूल परिणाम वीज वितरण यंत्रणेवर होत असतो पर्यायाने त्याचा परिणाम परीणाम ग्राहक आणि ग्राहक सेवांवर होत असतो.यामुळे उन्हाळा, अवकाळी पाऊस व त्यानंतर लगेचच सुरू होणारा पावसाळा हा वीज ग्राहकांना सुसह्य व्हावा यासाठी महावितरणने सैल झालेले गार्डींग व स्पन घट्ट करणे,दोन खांबामधील झोल पडलेल्या तारा ओढून घेणे,सर्व खांब आणि त्यांचे ताण सुस्थितीत करणे अपेक्षित आहे.वीज रोहित्रांची तपासणी करून तेलाची योग्य पातळी राखणे, स्टे वायरने वीजखांबांचा आधार मजबूत करणे,रोहित्रांचे अर्थिंग मजबुत करणे,पोल,वितरण पेट्या,फिडर पिलर्स,मिनी फिडर पिलर्स या सर्वांचे अर्थिंग सुस्थितीत करणे, वीज तारांजवळील झाडांच्या फांद्यांची छाटणी करणे ,फुटलेले पिन आणि इन्सुलेटर बदलणे, तपासणी व दुरुस्ती करणे वाहिन्यांचे खराब झालेले लाइटनिंग अरेस्टर बदलणे, भुमिगत वाहिन्यांचे तात्पुरते असलेले जाईंट कायमस्वरूपी करणे, वाहिन्यांचे खराब झालेले जंपर बदलणे, जीर्ण झालेल्या वायर बदलणे , पावसाचे पाणी साचणा-या परीसरातील फिडर पिलरची जमिनीपासून उंची वाढवणे आदि मान्सुनपुर्व देखभाल व दुरूस्तीची कामे मे महिन्याच्या उत्तरार्धात तातडीने करण्यात यावीत अशी मागणी करण्यात आली आहे. लोंबकळणा-या तारा व उघड्या रोहित्रांमुळे जिविताला धोका बहुतांश रोहित्र उघड्यावर असुन त्यांना संरक्षक कवच नसल्याने पावसाळ्यात निर्माण झालेला हिरवागार चारा चरण्यासाठी आलेली जनावरे विद्युत प्रवाहाचा धक्का लागुन दगावल्याच्या दुर्दैवी घटना घडलेल्या आहेत. तसेच लोंबकळणा-या तारांमुळे अपघाती घटना घडलेल्या आहेत त्याची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील रोहित्रांची दुरावस्था ; साहित्याची वानवा

ग्रामीण भागातील रोहित्रांची अत्यंत दुरावस्था असुन महावितरण कडुन आवश्यक साहित्य पुरवण्यात येत नसल्याने ग्रामस्थांनाच रात्री अपरात्री वीज गेल्यावर फ्युज टाकावे लागते.

# न्यू व्हिजन पब्लिक स्कुलच्या वतीने ३ मे ते १० मे दरम्यान समर कॅम्प-२०२४ संपन्न

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे न्यू व्हिजन पब्लिक स्कुल व टॉडलर्स व्हिले प्रि स्कुलच्या वतीने यावर्षी देखील व्हिजन समर कॅम्प-२०२४ संपन्न झाला. या कॅम्पमध्ये अंबाजोगाई शहर व परिसरातील विद्यार्थ्यां मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते. या समर कॅम्पच्या शेवटी अंबाजोगाई शहरात प्रथमच असा “कोन बनेगा समर चॅम्पस-२०२४” चे बहारदार आयोजन करण्यात आले होते.

यावर्षीच्या व्हिजन समर कॅम्पच्या सांगता समारोपाच्या कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन तथा माता सरस्वती पूजनाने करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत मोदी, संस्थेचे मार्गदर्शक वसंतराव चव्हाण , प्रा. डी. एच.थोरात, प्राचार्य रेंजो आर चंद्रन,अॅड. संतोष पवार , डॉ मनीषा पवार, धनराज सोळंकी , श्रीमती बजाज मॅडम , श्रीमती रेड्डी या उपस्थित होत्या.

दिनांक ३ मे ते १० मे दरम्यान व्हिजन समर कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. व्हिजन समर कॅम्प मध्ये वय वर्ष ३ ते १४ या वयोगटातील मुले सहभागी झाली होती .या कॅम्प मध्ये सहभागी विद्यार्थ्यांना विविध कौशल्याची ओळख करून देण्यात आली ज्यामध्ये पक्षीनिरीक्षण , कुंभारकाम , घोडेस्वारी, निंजा वारीयर , मडी मार्वल , मैदानी खेळ , मनोरंजक नृत्य, आपत्कालीन परिस्थितीतील अवधान , श्लोक पठण , कागदी टोप्या बनवणे , गुड टच बॅड टच , चटपटा चॅट सारखे विविध उपक्रमविद्यार्थ्यांना शिकवण्यात आले. यावर्षीच्या व्हिजन समर कॅम्पचे विशेष आकर्षण म्हणजे कार्यकारी संचालक संकेत मोदी यांच्या संकल्पनेतील एक आगळा वेगळा उपक्रम मुलांच्या बुद्धीला चालना देणारा , आनंद देणारा , आणि रोख रकमेच्या बक्षिसे , विद्यार्थ्यांच्या अंगी आत्मविश्वास मिळवून देणारा अंबाजोगाईत पहिलाच रिअॅलिटी गेम शो “ कोन बनेगा समर चॅम्प,- २०२४”' पार पडला . ही स्पर्धा वयोगट ७ ते ९ व १० ते १४ अशा दोन गटात घेण्यात आली. विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी व त्यांच्या बुद्धिमत्तेला चालना मिळावी या उद्देशाने देशातील शैक्षणिक , सांस्कृतिक , व्यवहारीक व ऐतिहासिक विषयावर बहुपर्यायी विविध प्रकारचे प्रश्न विद्यार्थ्यांना मोठ्या पडद्याद्वारे विचारण्यात आले. या स्पर्धेत दोन्ही गटातील एकून १२ संघांनी आपले ज्ञान आणि गती दाखवून दिली.




यातील ७ ते ९ या वयोगटातून प्रथम आलेल्या संघाला (अर्णव चौधरी व आरोही राऊत ) यांना ११,००० रुपयांचे रोख बक्षीस व १० ते १४ या वयोगटातून प्रथम आलेल्या संघातील (आर्या दायमा व क्रिशा इंदानी ) २१,००० रुपयांचे रोख बक्षीस देण्यात आले . सदरील रोख रक्कम ही विजेत्यांना फिक्स डिपॉझिटच्या माध्यमातून विभागून देण्यात आली जेणेकरून सात वर्षानंतर त्यांना ही रक्कम नक्कीच वाढवून मिळेल आणि विद्यार्थ्यांना देखील आपोआप बचतीची सवय देखील लागेल.

आयोजित या प्रश्नमंजुषा कार्यक्रमाचे सूत्रसंचालन न्यू व्हिजन पब्लिक स्कुलच्या विद्यार्थिनींनी केले. कार्यक्रमाच्या सूत्र संचालकांनी प्रेक्षकांनाही या उपक्रमात सहभागी करून घेतले. प्रेक्षकांनीही प्रश्नांची उत्तरे देऊन बक्षीसे मिळवली. ‘कौन बनेगा समर चॅम्प ‘ या रियालिटी शो साठी शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शिवेंद्रसिंह कणसे , हर्षल गजभार , दिव्या इंगळे, प्रिया कांदे ,शिवानी तोडकर, ईश्वरी कराड यांनी तर आभार दतात्रय नेवल यांनी मानले. आयोजित कॅम्पच्या सांगता समारोपाच्या कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक राजकिशोर मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी, व्ही. बी .चव्हाण, प्राचार्य बी. आय. खडकभावी, प्रा. सुरेश बिराजदार प्रा. विवेकानंद राजमाने ,प्राचार्य श्री रेंजू आर चंद्रन यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या व मुलांचे कौतूक केले.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )